# दिवा न्यूज

दिशादर्शक, मार्गदर्शक!

▶ वर्ष–३

■ अंक–२८

दिवा न्यूज
आता डिजिटल स्वरूपात...
दिवा न्यूज़ची वेबसाईट सुरु..!
ताज्या घडामोडी आणि बातम्यांसाठी लॉग इन करा
www.diwanews.com
आता कुठेही असा...दिवा न्यूज़ वाचा एका क्लिक वर..
epaper.diwanews.com

■ epaper.diwanews.com ■ सोमवार, १२ फेब्रुवारी २०२४ ■ पाने–८ ■ किंमत ४ रु. ■ RNI No.-MAHMAR/2021/80669 ■ www.diwanews.com


# दिव्यातील पाणीटंचाई सुटता सुटेना!




## पाण्यासारखा पैसा पाण्यासाठी खर्च होतो, तरीही अनेक नागरिकांना दिलासा नाही...कारण वितरण व्यवस्था सक्षम नाही!

**दिवा :** मागील काही दिवसापासून दिवा शहरात अनेक भागात पाणीटंचाई आहे. इमारतींच्या खाली खाजगी टँकरच्या रांगा लागलेल्या पाहायला मिळतात. मागील पाच वर्षापासून या स्थितीत फारसा बदल झालेला नाही. अनधिकृत पाणीपुरवठा लाईन खंडित केल्याने पाणीटंचाई निर्माण झाल्याचे सांगितले जात असले, तरी अधिकृत पाणीपुरवठा नागरिकांना होणारी यंत्रणा ठाणे महापालिकेने प्रत्यक्षात उभारली आहे का? हा प्रश्न अनुत्तरीत राहतो.याच प्रश्नामुळे दिवा शहरातील पाणीटंचाई दिवसेंदिवस वाढत आहे.

करोडो रुपयांच्या योजना झाल्याने प्रश्न सुटेल असे नाही. नियोजनाचा बोजवारा उडाला तर विकासनिधी खर्च होऊनही नागरिकांचे प्रश्न सुटत नाहीत अशी अनेक उदाहरणे आहेत. सदोष वितरण व्यवस्था हे दिवा शहराच्या पाणी समस्येचे मूळ कारण आहे.काही भागात नागरिकांना एक ते दीड लाख रुपये खर्च करून अनेक वेळेला खाजगी प्लंबर कडून पाण्याच्या लाईन घ्याव्या लागतात.नाले गटारे यातून या पाणीलाईन टाकल्याने आरोग्याचा प्रश्न तर निर्माण होतोच पण पाणी पुरवठा अखंडित सुरू राहील याचीही कोणती खात्री नागरिकांना नसते.नागरिक पाणी बिल भरतात तरीही त्यांना पाणी मिळत नाही अशीही अनेक उदाहरणे आहेत.अनधिकृत पध्दतीने घेतलेल्या या पाण्याच्या लाईन अनेकवेळा महापालिकेच्या कारवाईत कापल्या जातात.नागरिकांना पाणीपुरवठा विभाग जिथून पाणी कनेक्शन देतात तिथून पाणी पुरवठा अनेकांना होत नाही. अशा वेळी अनेक नागरिक जोखीम घेऊन खासगी प्लंबर कडून पाणी लाईन घेतात.अशा लाईन देणाऱ्यांवर आतापर्यंत काय कारवाई झाली याचं उदाहरण सापडत नाही. मात्र नागरिकांच्या पैशांचा मात्र चुराडा होतो. महापालिका प्रशासन अंतर्गत पाणीपुरवठा वितरण व्यवस्था सक्षम करण्यात अपयशी ठरल्याने नागरिकांना पाण्यासाठी वारंवार भटकावे लागते आणि त्यातून खाजगी प्लंबरचे मात्र खिसे भरले जातात.दिव्यात पाणी पुरवठा हा व्यवसाय होतोय की काय? अशी परिस्थिती काही ठिकाणी पाहायला मिळते. महिना पाच ते दहा हजार रुपये घेऊन काहीजण इमारतींना पाणीपुरवठा करत असल्याचे उदाहरणं याआधी उघडकीस आली आहेत. कदाचित हे अशा पद्धतीने शासकीय पाणी खाजगी वितरकांमार्फत नागरिकांना देणार पहिलं शहर असावं.या व्यवस्थेवर महापालिका प्रशासनाचा कोणताही कंट्रोल नाही. स्थानिक लोकप्रतिनिधींचा नागरिकांना दिलासा देण्याचा कुठलाही उपक्रम यामध्ये पाहायला मिळत नाही. उलट पक्षी पाण्यासाठी बेजार झालेले नागरिक हे मिळेल त्या माध्यमातून आपल्या इमारतींना,चाळींना पाणीपुरवठा करून घेण्याकडे वळलेले दिसतात. दिवा शहरातील अनेक सोसायट्यांचा रविवार हा पाणी समस्येवर तोडगा काढण्यासाठी जातो. महापालिकेने मागील दोन ते तीन वर्षात पाणीपुरवठा सुरळीत करण्यासाठी महत्वकांक्षी योजना दिव्यात राबवल्या. नव्या पाईपलाईनचे उद्घाटन देखील झाले.दिवा शीळ या पाईपलाईनचे काम सुरू आहे. मात्र मुख्य जलवाहिन्या टाकल्या जात असताना अंतर्गत पाणीपुरवठा लाईन कधी सुरू होणार हा नागरिकांसमोरील प्रश्न आहे. नागरि परिसरात पाणी वितरण व्यवस्था सक्षम नसल्याने लांबून खाजगी पाण्याच्या लाईन आणण्याकडे नागरिकांचा कल असतो. बरं अशा पद्धतीने पाणीपुरवठा करणाऱ्यांना दिवा शहरात पाणी उपलब्ध होते.मात्र महिना हजारो रुपये पाण्यावर खर्च करणाऱ्या नागरिकांना महापालिकेचे मुबलक पाणी उपलब्ध होत नाही, ही दुर्दैवाची गोष्ट आहे.टँकर लॉबी दिव्यात सुसाट आहे. टँकर लॉबीला पाणी उपलब्ध होते, मात्र सर्वसामान्य नागरिक जो नोकरदार वर्गातून येतो त्याला या ठिकाणी पाण्याची व्यवस्था पुरेशा प्रमाणात झालेली दिसत नाही. याकडे महापालिका प्रशासन लक्ष देणार आहे का?हा नागरिकांचा सवाल आहे. दिवा शहरातील नागरिक महिना टँकरचे पाणी घेण्यासाठी तीन ते चार हजार रुपये खर्च करतात.अनेक ठिकाणी पाण्याच्या खाजगी लाईन घेण्यासाठी एक ते दीड लाख रुपये खर्च केले जातात. दीड ते दोन किलोमीटर अंतरावरून या पाण्याच्या लाईन आणल्यानंतर त्या कापल्या जातात. पुन्हा नागरिकांना पाण्यासाठी खर्च करावा लागतो.मुळात प्रश्न हा आहे, जे नागरिक पाहण्यासाठी हजारो रुपये खर्च करतात ते महापालिकेच्या अधिकृत कनेक्शनचे बिल भरणार नाहीत का? महापालिकेने याकडे गांभीर्याने लक्ष द्यायला हवे. हा प्रश्न निकालात काढायला हवा. दिव्यातील पाणी प्रश्न सोडवण्यासाठी पालिका आयुक्तांनी विशेष पुढाकार घेऊन ठोस कार्यक्रम हाती घ्यायला हवा.दिव्यातील पाणी वितरण व्यवस्था सुधारणे गरजेचे आहे. दहा दहा एमएलडी पाणी वाढवून दिव्याचा पाणी प्रश्न सुटणार नाही. तर वाढवलेलं पाणी नागरिकांच्या घरापर्यंत पोहोचवणारी यंत्रणा सक्षम करणं गरजेचं आहे.दुर्दैवाने ती दिव्यामध्ये झालेली नाही. यासाठी महापालिकेने पुढाकार घेऊन दिव्यातील अंतर्गत पाणीपुरवठा सुरळीत करण्याकडे लक्ष द्यायला हवा.यातूनच दिव्यातील पाणी प्रश्न सुटण्याचा मार्ग सापडेल.

# नमो महारोजगार मेळाव्याच्या यशस्वितेसाठी नवी मुंबई महानगरपालिका सज्ज

**नवी मुंबई :** कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागामार्फत बेरोजगार युवक तसेच नवउद्योजकांच्या कल्पनांना चालना देण्यासाठी दि. २४ व २५ फेब्रुवारी २०२४ रोजी, सकाळी १० ते सायं. ५ या कालावधीत हायलॅण्ड ग्राऊंड, ढोकाळी, माजीवाडा, ठाणे (पश्चिम) येथे नोकरी व रोजगार इच्छुक युवक व युवतींकरिता महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्र एकनाथ शिंदे यांच्या संकल्पनेतून 'नमो महारोजगार मेळावा' आयोजित करण्यात आलेला आहे.

या मेळाव्याच्या अनुषंगाने जास्तीत जास्त युवक युवतींना रोजगार उपलब्ध व्हावा याकरिता नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात मेळाव्याची जास्तीत जास्त प्रसिध्दी करावी असे निर्देश महापालिका आयुक्त राजेश नार्वेकर यांनी दिलेले आहेत.

या नमो महारोजगार मेळाव्याच्या अनुषंगाने सुयोग्य नियोजनाकरिता अतिरिक्त आयुक्त श्रीम. सुजाता ढोले यांची नोडल अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आलेली आहे. तसेच समाजविकास विभागाचे उपायुक्त श्री.किसनराव पलांडे यांची मुख्य नियंत्रण अधिकारी म्हणून तसेच समाजविकास अधिकारी सर्जैराव परांडे यांची नियंत्रण अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आलेली आहे. या मेळाव्याबाबत केल्या जात असलेल्या कार्यवाहीचा आढावा आयुक्तांमार्फत घेतला जात असून या मेळाव्याचा लाभ बेरोजगारांना मोठ्या प्रमाणात व्हावा यासाठी प्रयत केले जात आहेत.

या नमो महारोजगार मेळाव्यात रोजगार उपलब्ध करुन देणा-या जास्तीत जास्त आस्थापना, कंपन्या, व्यावसायिक सहभागी व्हावेत याकरिता व्यापक प्रचार व प्रसिध्दीच्या दृष्टीने विशेष अभियान २० फेब्रुवारीपर्यंत राबविले जात असून त्याकरिता विविध सोशल माध्यमांचा वापर तसेच गल्लोगल्ली रिक्षाव्दारे प्रचार केला जात आहे.

या माहिती प्रसारणाची व जास्तीत जास्त सहभाग नोंदविणी बाबतची जबाबदारी दोन्ही परिमंडळाच्या उपायुक्तांमार्फत आठही विभाग कार्यालयांच्या सहा.आयुक्त तथा विभाग अधिकारी यांच्याकडे सोपविण्यात आलेली आहे. त्यांनी आपल्या कार्यक्षेत्रातील विविध खाजगी आस्थापना, रुग्णालये, पॅथॉलॉजी सेंटर, मॉल्स, बांधकाम व्यावसायिक, हॉस्पिटॅलिटी संस्था, हाऊसकिपींग एजन्सी आदी ठिकाणी संपर्क करुन त्यांना आवश्यक असलेल्या कर्मचा-यांची माहिती महास्वयम् या शासकीय पोर्टलवरhttps://rojgar.mahaswayam.gov.in अपलोड करण्याचे सूचित करावयाचे आहे. तसेच विविध महाविद्यालय, स्वयंसेवी व सेवाभावी संस्था, मंडळे, महिला बचत गट यांच्याशी संपर्क साधून या मेळाव्याचा जास्तीत जास्त बेरोजगार युवक-युवतींनी लाभ घ्यावा यादृष्टीने प्रयत करावयाचे आहेत.

या मेळाव्यात नोकरी इच्छुक युवक युवती हे मुलाखतीसाठी तसेच महाएक्सपोमध्ये स्टार्टअप्स, इन्व्हेस्टर्स व इन्कुबेटर्स कुशल मनुष्यबळ उपलब्धतेसाठी सहभागी होणार आहेत. याठिकाणी दहावी, बारावी, आयटीआय, पदविका, पदवीधर उमेदवारांच्या मुलाखती घेत रोजगारांच्या संधी उपलब्ध करुन दिल्या जाणार आहेत. एका उमेदवाराला एकापेक्षा अधिक नोक-यांसाठी देखील अर्ज करुन मुलाखात देण्याची संधी उपलब्ध असणार आहे. या महारोजगार मेळाव्यातून उमेदवाराच्या शैक्षणिक अर्हतेनुसार तसेच कौशल्यानुसार त्यास रोजगाराच्या मोठया संधी उपलब्ध होणार असून याकरिता उमेदवारांनी महास्वयम् या शासकीय पोर्टलवर https://rojgar.mahaswayam.gov.in नोंदणी करणे आवश्यक आहे. तसेच यामध्ये व्यावसायिक, लघुउद्योग, कंपन्या विविध आस्थापना यांचा सहभाग असावा यादृष्टीने त्यांच्याकडील कुशल, अर्धकुशल, अकुशल कामगारांच्या उपलब्ध असलेल्या जागांची माहिती महास्वयम् या शासकीय पोर्टलवर https://rojgar.mahaswayam.gov.in अपलोड करावी असे पत्राद्वारे सूचित करण्यात आलेले आहे. याबाबत काही अडचण असल्यास संबंधितांनी १८०० १२० ८०४० या हेल्पलाईन क्रमांकावर साधावयाचा आहे.

मुख्यमंत्री महोद्यांच्या संकल्पनेतून दि. २४ व २५ फेब्रुवारी रोजी ठाणे येथे आयोजित करण्यात आलेल्या कोकण विभाग स्तरीय नमो महारोजगार मेळाव्याचा लाभ नवी मुंबईतील युवक-युवतींनी मोठ्या प्रमाणावर घ्यावा तसेच येथील व्यावसायिक, उद्योजक व आस्थापनांनीही आपल्याला आवश्यक असलेले मनुष्यबळ हे महास्वयम् या शासकीय पोर्टलवरhttps://rojgar.mahaswayam.gov.in नोंदणी करुन या मेळाव्यातून उपलब्ध करुन घ्यावे असे आवाहन महापालिका आयुक्त श्री. राजेश नार्वेकर यांच्या वतीने करण्यात येत आहे.

# नाशिकच्या दोन वर्षीय चिमुकलीला मिळाली दृष्टी



**ठाणे :** जन्मजात एक नाहीतर दोन्ही डोळ्यात मोतीबिंदू असलेल्या नाशिक इगतपुरीच्या " जानु " या दोन वर्षीय चिमुकलीवर ठाणे जिल्हा शासकीय रुग्णालयात यशस्वी काही मिनिटांची लेझर शस्त्रक्रिया नुकतीच पार पडली आहे. अशाप्रकारे अवघड शस्त्रक्रिया रुग्णालयातील डॉक्टरांनी प्रथमच करून तिला दृष्टी मिळून दिली आहे. ठाणे जिल्हा रुग्णालयाची कीर्ती ऐकूण माळी कुटुंब आले होते. त्यांना येथील डॉक्टरांनी निराश होऊ न देता हसऱ्या चेहऱ्याने लाडक्या लेकीसोबत घरी लवकरच परतली. ही शस्त्रक्रिया करून जिल्हा शासकीय रुग्णालयाकडे वारंवार नाके मुरडणाऱ्यांच्या डोळ्यात चांगलेच अंजन भरले गेले आहे. पुन्हा एकदा ठाणे जिल्हा शासकीय रुग्णालय हे गोरगरिबांसाठी वरदानदायी ठरत असल्याचे दिसत आहे.

नाशिक, इगतपुरी परिसरात राहणाऱ्या माळी कुटुंबातील जानु या दोन वर्षाच्या चिमुकलीला डोळ्यांनी नीट दिसत नव्हते. केवळ प्रकाशाची संवेदना तिला जाणवत होती. नाशिकात तीच्या डोळ्यांची तपासणी केल्यावर तिला मोतीबिंदू असल्याचे स्पष्ट झाले. सरकारी रुग्णालयात मोतीबिंदू शस्त्रक्रिया करायची झाल्यास कुठे करावी असा प्रश्न तिच्या पालकांना होता. ठाणे सिव्हील रुग्णालयात मोतीबिंदू शस्त्रक्रिया चांगली होत असल्याचे त्यांना समजले. मुलीला रुग्णालयात दाखल केल्यानंतर जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. कैलास पवार आणि अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. धीरज महांगडे यांच्या मार्गदर्शनाखाली तीच्या डोळ्यांची मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्याचे चॅलेंज स्वीकारून ती शस्त्रक्रिया यशस्वी पार पडली. तसेच या शस्त्रक्रिया वेळेत करणे खूप गरजेचे असते. तर या शस्त्रक्रियेपूर्वी तिची शारीरिक तपासणी करून शस्त्रक्रियेच्या आठवडाभराने तिला घरी सोडण्यात आल्याची माहिती नेत्र सर्जन डॉ. शुभांगी अंबाडेकर यांनी दिली. तर या शस्त्रक्रियेसाठी भूलतज्ज्ञ डॉ. प्रियांका महांगडे, डॉ.रुपाली यादव आणि केमाचारी यांनी परिश्रम घेतले.

***ही शस्त्रक्रिया जरी काही मिनिटांची असली तरी रुग्णालयासाठी तितकीच चॅलेंजदायी होती. ती शस्त्रक्रिया यशस्वी होईल हा विश्वास होताच, ती पार पडली असून लवकर रुग्णाला घरी सोडण्यात येईल. ही शस्त्रक्रिया आमच्यासाठी खूप मोठी गोष्ट आहेच. त्याचबरोबर त्या कुटुंबाचा चेहऱ्यावरील हास्य ही तितकेच महत्वाचे आहे.***

***- डॉ कैलाश पवार, जिल्हा शल्य चिकित्सक, ठाणे***

# निष्ठावान ज्येष्ठ शिवसैनिक रामचंद्र काकडे यांचे अल्पशा आजाराने निधन

**ठाणे:** निष्ठावान ज्येष्ठ शिवसैनिक रामचंद्र उर्फ रामभाऊ काकडे वयाच्या ६७ व्या वर्षी अल्पशा आजाराने लुईसवाडीतील त्यांच्या राहत्या घरी निधन झाले. त्यांच्या पाच्श्रात त्यांचा मुलगा सून व त्यांची दोन नातवंड असा त्यांचा परिवार आहे असून पुढील विधी त्यांच्या मूळ गावी सोलापूर येथे होणार आहे.



त्यांचे मूळ गाव सोलापूर परंतु नोकरी ठाण्यात शिवसैनिक मधुकर पाटील यांच्या गुरु कन्स्ट्रक्शन या कंपनीमध्ये असल्याने धर्मवीर आनंद दिघे साहेबांचे येणे जाने यांच्या कंपनीत अधिक असल्यामुळे शिवसेनेची नाळ त्यांच्याशी जुळली गेली व त्यांनी धर्मवीर आनंद दिघे साहेबांची कार्यशैली अत्यंत जवळून पहिली होती. त्यांचाच वसा उचलून समाजसेवेची आवड त्यांच्यात निर्माण झाली व ते राहत असलेल्या लुईसवाडी विभागात शिवसेनेचे शाखाप्रमुख अशोक बोरीटकर यांच्या सोबत आपल्या कार्यशैलीतून समाज सेवा सुरु केळी. निवडणुका, शिवजयंती उत्सव, मालंगड यात्रा, आंदोलन, विभागातील नागरिकांच्या मूळ गरजा असो नेहमीच सक्रीय असे, त्यांनी कोणत्याही पदाची अपेक्षा न करता आपल्या कार्यशैलीतून त्याचं लिखाण व पत्र व्यवहार प्रशासनाशी सुरु होता.

अत्यंत शिस्तप्रिय असल्याने त्यांच्यासोबत काम करणाऱ्यांमध्ये त्यांचा नेहमी दबदबा असे, असा निष्ठावंन ज्येष्ठ शिवसैनिक रामचंद्र काकडे आज आपल्यातून हरपल्याने संपूर्ण शिवसेना परिवाराकडून त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि संपादक सुहास शांताराम खंडागळे यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया आणि पब्लीकेशन प्रा. लि. प्लॉट क्र. डब्ल्यू २३०, टीटीसी खैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून, श्रीकृपा बिल्डींग, ए-विंग, पहिला माळा, फ्लॅट क्रमांक १०१, सेंट मेरी शाळेजवळ, दिवा (पूर्व), ठाणे-६१२ ता/जि-ठाणे राज्य-महाराष्ट्र येथून प्रकाशित केले. संपर्क-८०८०९७७९५५
**संपादक-सुहास शांताराम खंडागळे RNI No.-MAHMAR/2021/80669**

दिशादर्शक, मार्गदर्शक!
# दिवा न्यूज
सोमवार, दि. १२ फेब्रुवारी २०२४

www.diwanews.com





# कळवा परिसरात सर्वंकष स्वच्छता मोहिमेत रस्ते, नाल्यांसह उद्यानांचीही स्वच्छता








**ठाणे** – मा.मुख्यमंत्री यांच्या आदेशानुसार महापालिका आयुक्त अभिजीत बांगर यांच्या म र्गदर्शनाखाली ठाणे शहरात सर्वंकष स्वच्छता मोहीम सुरू आहे. या मोहिमेअंतर्गत आज महापालिकेच्या कळवा प्रभाग समिती कार्यक्षेत्रात आयोजित केलेल्या सर्वंकष स्वच्छता अभियानास स्थानिक नागरिक व शालेय विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

या मोहिमेत सफाई कर्मचा-यांसोबत महापालिका अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे, उपायुक्त तुषार पवार, मनीष जोशी, अनघा कदम, उपनगरअभियंता विकास ढोले, सहाय्यक आयुक्त सचिन बोरसे तसेच महापालिका अधिकारी कर्मचारी सहभागी झाले होते.

सकाळी ६.०० वाजता कळवा नाका येथून सुरूवात करण्यात आली. कळवा परिसरातील मुख्य रस्ते हे झाडून तद्नंतर पाण्याने स्वच्छ करण्यात आले. रस्त्यावरील दुभाजक हे स्क्रबरच्या साहाय्याने घासून नंतर पाण्याच्या फवारणीने स्वच्छ धुण्यात आले. परिसरातील रस्त्यांबरोबरच शहरातील उद्याने व मोठे नाले देखील स्वच्छ करण्यात येत आहेत. नाल्यातील गाळ काढला जात असल्याचे अतिरिक्त आयुक्त २ प्रशांत रोडे यांनी नमूद केले.

कळवा परिसरातील सर्वंकष स्वच्छता मोहिमेत कळवा नाका परिसर, बेलापूर रोड , कळवा सर्कल, नक्षत्र गार्डन घाट, मनिषा नगर परिसर गेट नं, मनिषा नगर स्मशानभूमी, शास्त्रीनगर सत्संग भवन, कळवा प्रभाग समिती कार्यालगत घड्याळ चौक, कळवा स्टेशन पूर्व चिंधी नाला, सह्याद्री शाळा परिसर, खारेगाव नाका सर्कल, पारसिक नगर रघुकुल परिसर, बाळाराम पाटील चौक व परिसर, रेतीबंदर विसर्जन घाट, बेलापूर रोड गणपती पाडा, बेलापूर रोड, सुर्या नगर, प-याचे मैदान विसर्जन घाट, विटावा कोळीवाडा, भोलानगर, वाघोबा नगर, कळवा नाका सर्कल, स्व. आनंद उड्डाणपूल परिसर, आतकोनेश्वरनगर व परिसर, पौंडपाडा, इंदिरानगर, कळवा न्यू मार्केट आदी परिसरातील स्वच्छता करण्यात आली.

# ठाण्यातील १४०० भाविकांनी घेतले अयोध्येत श्री रामलल्लाचे दर्शन

## भाजपाचे आमदार निरंजन डावखरे यांच्या नेतृत्वाखाली भाविकांची व्यवस्था



***ठाणे : ठाण्याहून विशेष आस्था ट्रेनने अयोध्येत पोचलेल्या १४०० भाविकांनी काल सायंकाळी श्री राम लल्लाचे दर्शन घेतले. तब्बल ५०० वर्षांनंतर श्री राम जन्मभूमीवर साकारलेल्या मंदिरात दर्शन घेताना भाविक गहिवरून गेले होते.***

*बालकरामचे रुप पाहून अनेकांच्या डोळ्यात आनंदाश्रू आले. या भाविकांची प्रदेश भाजपाच्या माध्यमातून आमदार निरंजन डावखरे यांनी अयोध्येत व्यवस्था केली होती.*

*भाजपातर्फे श्रीरामाच्या दर्शनासाठी सोडण्यात आलेल्या ठाणे लोकसभा मतदारसंघातील भाविकांच्या अयोध्या आस्था विशेष ट्रेनला ठाण्यातून जय श्रीराम...च्या गजरात बुधवारी रात्री हिरवा झेंडा दाखविण्यात आला. सुमारे ३५ तासांच्या प्रवासानंतर अयोध्या येथील सालारपूर रेल्वे स्थानकात ट्रेन पोचली. या ट्रेनमधील भाविकांचे आमदार निरंजन डावखरे यांनी अयोध्येत स्वागत केले. त्यानंतर या भाविकांची निवास व भोजन व्यवस्था करण्यात आली.*

*या भाविकांनी काल शुक्रवारी सायंकाळी श्री प्रभू रामाचे दर्शन घेतले. त्यानंतर हनुमानगढी येथे श्री हनुमानाचे दर्शन घेऊन प्रार्थना केली. शरयू नदीच्या तीरावर सायंकाळी उशीरा झालेल्या महाआरतीत आमदार निरंजन डावखरे यांच्यासह ठाण्यातील सर्व भाविक सहभागी झाले होते. प्रसन्न वातावरणात झालेल्या या महाआरतीवेळी अपूर्व जल्लोष व श्रीराम नामाचा गजर करण्यात आला.*

*दरम्यान, या सर्व भाविकांची भाजपाच्या प्रदेश कार्यालयाच्या टीमने निवास, भोजन आणि वाहतूक व्यवस्था केली होती. त्याबद्दल भाजपाचे प्रदेश प्रवक्ते लक्ष्मण सावजी, पंकज काळे, नगरसेवक हरीश भांदिर्गे, मुंबई भाजपा उपाध्यक्ष आचार्य पवन त्रिपाठी, पंकज यादव, योगिराज दाभोळकर, प्रमोद मिश्र, प्रदीप त्रिपाठी, बिमल भूता, सुरेश मिश्र, श्रवण मिश्र यांचे आमदार निरंजन डावखरे यांनी आभार मानले.*

# भाजपा आणि सन्मान फाउंडेशन आयोजित नमो चषक सुधागड तालुका कबड्डी स्पर्धेत वावे संघाने मारली बाजी

**ठाणे** : भारतीय जनता पार्टी ठाणे शहर (जिल्हा) व सन्मान फाउंडेशन यांच्यावतीने आयोजित नमो चषक २०२४ या सुधागड तालुकास्तरीय कबड्डी स्पर्धा ठाण्यातील कॉम्रेड गोदुताई परुळेकर मैदान येथे रविवारी पार पडल्या. सन्मान फाउंडेशनचे अध्यक्ष रमेश सागळे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडलेल्या या कबड्डी स्पर्धेत सुधागड तालुक्यातील ३२ संघानी सहभाग घेतला होता. नाथभैरव क्रीडा मंडळ झाप आणि भैरवनाथ क्रीडा मंडळ वावे यांच्यात चुरशीच्या झालेल्या सामन्यात वावे संघाने अंतिम विजय संपादन केला. तर झापचा संघ उपविजेता ठरला. या स्पर्धांचे उद्घाटन आमदार संजय केळकर यांच्या हस्ते पार पडले. दिवसभरात ठाणे व सुधागडातील अनेक राजकीय व सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांनी उपस्थिती दर्शविली. यावेळी सैन्यदलातून निवृत्त झालेल्या सुधागडातील जवानांचा विशेष सन्मान करण्यात आला.





अंतिम विजयी संघ श्री भैरवनाथ क्रीडा मंडळ – वावे, उपविजयी संघ श्री नाथभैरव क्रीडा मंडळ झाप, उप-उप विजयी संघ श्री सोमजाई माता क्रीडा मंडळ गोमाशी, उप उप विजयी संघ – वरदायनी राबगाव –सर्वोत्कृष्ठ खेळाडू– विशाल म्हस्के (वावे) उत्कृष्ट पक्कड प्रणव रटाटे(झाप) उत्कृष्ट चढाई सुरज मगर ( गोमाशी) शिस्त बद्द संघ जयहनुमान क्रीडा मंडळ, पिलोसरी ठरले.

ठाण्यातील गोदुताई परुळेकर मैदान येथे रविवारी भाजपा आणि सन्मान फाउंडेशनचे रमेश सागळे यांनी आयोजित केलेल्या नमो चषक सुधागड तालुका कबड्डी स्पर्धेत भैरवनाथ क्रीडा मंडळ वावे संघाने बाजी मारली. सुधागड तालुक्यातील ३२ संघानी या स्पर्धेत सहभाग घेतला होता. सकाळी आमदार संजय केळकर यांच्याहस्ते या स्पर्धांचे उद्घाटन करण्यात आले.

यावेळी शिवसेना प्रवक्ते नरेश म्हस्के, पत्रकार प्रफुल वाघोले, जी. पी. पारसिक बँकेचे नारायण गावंड, भाजपा महाराष्ट्र प्रदेश सदस्य राजेश मापारा, भाजपा महाराष्ट्र प्रदेश सचिव सचिन आळशी, ठामपा परिवहन सदस्य राजेश मोरे, भाजपा ठाणे शहर अध्यक्ष संजय वाघुले, मा. नगसेवक संदीप लेले, मा. नगरसेविका प्रतिभा मढवी, ॲड. सुभाष काळे, महेश कदम, जतीन शाह, सुधागड तालुका रहिवासी सेवा संघ ठाणे अध्यक्ष विठ्ठल घाडगे, ज्येष्ठ सल्लागार विठ्ठल खेरटकर, सचिन पाटील यांच्यासह ठाणे, सुधागडातील अनेक मान्यवरांनी उपस्थिती दर्शविली.

कार्यक्रमाचे सुत्रासंचालन नरेश शेडगे, अलंकार मनवी, कैलास म्हात्रे, केतन म्हस्के, राकेश थोरवे, सौरभ सागळे यांनी केले.

कार्यक्रमासाठी प्रकाश शिलकर, अविकांत साळुंके, राकेश थोरवे, जयगणेश दळवी, धनंजय खाडे, प्रविण बामणे, अजित सागळे, अनिल सागळे, हरिश्चंद्र मालुसरे, अनिल चव्हाण, अमर सागळे, सौरभ सागळे, जितू चव्हाण, राज बेलोसे, महेश मांढरे, रविंद्र सागळे, पुंडलीक मोरे, अजय जाधव, कैलास सागळे, काशिनाथ सागळे, भगवान तेलंगे, श्याम बगडे, विजय जाधव, रघुनाथ इंदुलकर, दत्ता सागळे, रुपेश चव्हाण, गजानन केदारी, समीर सागळे, रुपेश चव्हाण, विकास यादव, आकाश सागळे, जितेंद्र सागळे, सचिन सागळे यांच्यासह सुधागड तालुका रहिवासी सेवा संघाचे सर्व पदाधिकारी कार्यकर्ते यांनी सहकार्य केले.

# महापालिका लोकशाही दिन ४ मार्च, २०२४ रोजी

## २० फेब्रुवारी पर्यंत निवेदन सादर करण्याचे नागरिकांना आवाहन

**ठाणे :** महापालिकेचा पुढील लोकशाही दिन ०४ मार्च, २०२४ रोजी होणार आहे. तरी नागरिकांनी मार्च महिन्याच्या लोकशाही दिनाच्या १५ दिवस आधी म्हणजेच दिनांक २० फेब्रुवारी पर्यंत त्यांचे अर्ज- निवेदन महापालिका भवन, नागरी सुविधा केंद्र येथे दोन प्रतीत सादर करावे. हे निवेदन दाखल करताना अर्जदाराने प्रपत्र-१ (ब) प्रत्येक निवेदना सोबत अर्जदाराने सादर करणे आवश्यक आहे. प्रपत्र-१ (ब) नागरी सुविधा केंद्र येथे उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे.

महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाकडील परिपत्रक क्र .प्रसुधा-१०९९/सीआर-२३/९८/१८-अ, दिनांक २६ सप्टेंबर २०१२ नुसार माहे डिसेंबर-२०१२ पासून लोकशाही दिनाच्या दिवशी नागरिकांची निवेदने न स्विकारता, हे निवेदन दोन प्रतीत लोकशाही दिनाच्या १५ दिवस आधी महापालिका कार्यालयात सादर करणे आवश्यक असल्याचे आदेश काढण्यात आले आहेत.

मुख्यालयातील या लोकशाही दिनामध्ये, परिमंडळ लोकशाही दिनामध्ये ज्या नागरिकांनी आपली निवेदने सादर केलेली आहेत, तसेच त्या निवेदनावर १ महिन्यापर्यंत कोणतीही कार्यवाही झाली नाही, अशाच निवेदनांचा स्वीकार करण्यात येईल. नागरिकांनी महापालिका मुख्यालयातील लोकशाही दिनामध्ये निवेदन सादर करताना परिमंडळ लोकशाही दिनामध्ये मिळालेला टोकन क्रमांक नमूद करणे आवश्यक आहे.

अर्जदाराने एका अर्जात एकच तक्रार सादर करावी, एकापेक्षा जास्त तक्रारी असलेला अर्ज स्वीकारला जाणार नाही. त्याचप्रमाणे आस्थापना विषयक, विविध न्यायालयात, लोकआयुक्त यांचेकडे प्रलंबित असलेल्या प्रकरणाच्या तक्रारी, माहिती अधिकार कक्षेत येणारी प्रकरणे, तसेच राजकीय पक्षाच्या, नगरसेवकांच्या संस्थेच्या लेटरहेडवरील अर्ज अंतिम उत्तर दिलेले आहे किंवा देण्यात येणार आहे, अशा प्रकरणी केलेला अर्ज, तक्रार वैयक्तिक स्वरुपाची नसेल तर अर्ज स्वीकारला जाणार नाही.

# २४ व २५ फेब्रुवारी रोजी ठाण्यात होणार नमो महारोजगार मेळावा

**ठाणे :** कौशल्य, रोजगार,उद्योजकता व नाविन्यता विभागामार्फत बेरोजगार युवक तसेच नवउद्योजकांच्या कल्पनांना चालना देण्यासाठी हायलॅण्ड ग्राऊंड, ढोकाळी, माजीवाडा, ठाणे (पश्चिम) येथे कोकण विभागांतर्गत ठाणे, पालघर, रायगड, सिंधुदुर्ग, मुंबई उपनगर, मुंबई शहर जिल्ह्यातील नोकरी इच्छुक युवक व युवतींकरिता 'नमो महारोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा मेळावा २४ आणि २५ फेब्रुवारी २०२४ रोजी सकाळी १० ते सायंकाळी ५ या वेळेत होणार आहे. महापालिका आयुक्त अभिजीत बांगर यांच्या मार्गदर्शनाखाली या नमो महारोजगार मेळाव्यासाठी महापालिकेच्या माध्यमातून सर्व तयारी केली जात असून विविध विभागांमार्फत करण्यात येत असलेल्या विविध कामांचा आढावा आज अतिरिक्त आयुक्त २ प्रशांत रोडे यांनी घेतला.

या मेळाव्याच्या पूर्वतयारीसाठी आज (०७ फेब्रुवारी) महापालिकेतील विविध विभागांच्या विभागप्रमुखांची बैठक आयोजित करण्यात आली होती. मेळाव्याच्या ठिकाणी संपूर्ण स्वच्छता करणे, धूर व औषधफवारणी करणे, पिण्याच्या पाण्याच्या व्यवस्था तसेच मेळाव्यासाठी उपस्थित राहणाऱ्यांसाठी मोबाईल टॉयलेटची व्यवस्था, बसेस उपलब्ध करणे, विद्युत व्यवस्था, अग्निशामक सुविधा तसेच वैद्यकीय सेवा सुविधा उपलब्ध करुन देणेबाबतच्या सूचना अतिरिक्त आयुक्त २ प्रशांत रोडे यांनी संबंधितांना दिल्या. यावेळी उपायुक्त जी.जी. गोदेपुरे, वर्षा दिक्षीत आदी उपस्थित होते. या नमो महारोजगार मेळाव्याकरिता जास्तीत जास्त नोकरीच्या संधी उपलब्ध होण्याकरिता कौशल्य विकास विभागांतर्गत महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी,महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटी,व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय तसेच उद्योग व कामगार विभाग यांना विविध कंपन्याशी संपर्क साधून रिक्त पदे अधिसूचित जाहीर करण्याबाबत निर्देश देण्यात आलेले आहेत. तसेच ठाणे शहरातील विविध खाजगी आस्थापना, रुग्णालये, पॅथॉलॉजी सेंटर, मॉल्स आदी ठिकाणी पत्रव्यवहार करुन त्यांना आवश्यक असलेले कुशल- अकुशल कामगारांची यादी मागविण्यात यावी अशाही सूचना या बैठकीत देण्यात आल्या. या मेळाव्यात नोकरी इच्छुक युवक-युवती यांनी मुलाखतीसाठी आणि महाएक्सपो मध्ये स्टार्टअप्स, इनव्हेस्टर्स व इनकुबेटर्स सहभागी होणार आहेत. दहावी, बारावी,आय.टी.आय., पदविका,पदवीधर,पदव्युत्तर पदवी प्राप्त उमेदवारांच्या तेथेच मुलाखती घेत रोजगाराच्या संधी दिल्या जाणार आहेत. या मेळाव्यात नामांकित कंपन्या सहभागी होणार आहेत. https://qr-codes.io/gdhSNd किंवा www.rojgar.mahaswayam.gov.in या लिंक वरती जाऊन उमेदवार नोंदणी व नोकरीकरिता अर्ज करून प्रत्यक्ष मुलाखतीसाठी उपस्थित राहू शकतात. एका पेक्षा अधिक नोकरीसाठी देखील एकाच उमेदवाराला अर्ज करुन मुलाखत देता येतील. रोजगार मेळाव्यात सहभागी होणा-या उमेदवारांनी मेळाव्याच्या अगोदर ही नोंदणी करणे आवश्यक आहे. जे उमेदवार मेळाव्याच्या अगोदर नाव नोंदणी करतील, त्याच उमेदवारांच्या मेळाव्याच्या दिवशी मुलाखती होणार आहेत. या माध्यमातून दोन लाख युवक आणि युवतींना रोजगार देण्याचा संकल्प करण्यात आला आहे.

कोकण विभागांतर्गत ठाणे, पालघर, रायगड,सिंधुदुर्ग, मुंबई उपनगर, मुंबई शहर जिल्ह्यातील सर्व शासकीय, निमशासकीय, खाजगी आस्थापनांनी https://rojgar.mahaswayam.gov.in या वेब पोर्टलवर उद्योजक नोंदणी करून रिक्त पदे अधिसूचित/जाहीर करणे आवश्यक आहे. याबाबत काही अडचण असल्यास संबंधित जिल्ह्यातील नोडल अधिकारी यांच्याशी किंवा १८०० १२० ८०४० या हेल्पलाईन क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# जि. प. शेलवली बांगर शाळेचे नेत्रदीपक यश १५ विद्यार्थी एनएमएमएस शिष्यवृत्ती परीक्षा उत्तीर्ण




**ठाणे :** महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे आयोजित राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती योजना परीक्षेचा अंतिम निकाल घोषित झाला असून त्यात जिल्हा परिषद शाळा शेलवली बांगर केंद्र अल्याणी ता.शहापूर येथील विद्यार्थ्यांनी नेत्रदीपक यश संपादन केले आहे.

शाळेतील १७ विद्यार्थी शिष्यवृत्ती परीक्षेसाठी प्रविष्ठ झाले होते. १७ पैकी १५ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून त्यात दोन आदिवासी कातकरी समाजाच्या विद्यार्थिनींचा देखील समावेश आहे.

शहापूर तालुक्याचे उपक्रमशील गटशिक्षणाधिकारी मा. भाऊसाहेब चव्हाण, विस्ताराधिकारी मा. संगीता माळी, केंद्रप्रमुख डॉ. राजेंद्र चौधरी, मुख्याध्यापक श्री. बाळू धानके यांचे मौलिक मार्गदर्शन यशस्वी ठरताना दिसत आहे. तसेच वर्गशिक्षक श्री. सुधाकर पाटील यांनी ऑनलाइन व ऑफलाइन पद्धतीने केलेले मार्गदर्शन आणि शाळेतील श्री. हरी गावंडा, सौ. रेखा पाटील, श्री. रामदास बांगर, श्री. काशिनाथ शिंदे, श्री. महेश तारमळे इ. शिक्षकांचे वेळोवेळी मिळालेले मार्गदर्शन महत्त्वाचे आहे.

यशस्वी विद्यार्थ्यांचे शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष भरतभाऊ बांगर आणि सर्व सदस्यांनी या घवघवीत यशाबद्दल अभिनंदन केले आहे.

दिशादर्शक, मार्गदर्शक!
दिवा न्यूज
सोमवार, दि. १२ फेब्रुवारी २०२४
पान : ६
www.diwanews.com

# शिवसेनेच्या महाराष्ट्र महोत्सवाचे आयोजक नरेश मणेरा यांना विधानसभेत पाठवा – संजय राऊत

**ठाणे :** शिवसेना महाराष्ट्र महोत्सवाचे आयोजक नरेश मणेरा यांना आपल्याला विधानसभेत पाठवायचे आहे. खा. राजन विचारे ही आपली जबाबदारी आहे. येथे उपस्थित या सगळ्यांचीही ही जबाबदारी आहे, असे आवाहन शिवसेना नेते, खासदार संजय राऊत यांनी केले.

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे शिवसेना ओवळा माजिवडा विधानसभा क्षेत्र संपर्कप्रमुख व वैष्णवी प्रतिष्ठानचे अध्यक्ष नरेश मणेरा यांनी आयोजित केलेल्या महाराष्ट्र महोत्सवात प्रमुख अतिथी म्हणून शिवसेना नेते, खासदार संजय राऊत बोलत होते याप्रसंगी शिवसेना नेते, खासदार राजन विचारे, समिधा मोहिते, संजय तरे, महेश्वरी तरे, सचिन चव्हाण, दिनेश वर्मा, दादासाहेब गवळी, मधुसूदन विचारे, ज्योती कदम आदी मान्यवर उपस्थित होते.

महाराष्ट्र महोत्सवात गाण्याचा उत्तम कार्यक्रम सुरु असताना या कार्यक्रमाची लय बिघडून मला भाषण करायला बोलावले. हे बरोबर नाही, आमच्या सगळ्या भगिनी शिट्या मारत आहे, हीच खरी शिवसेना आहे. शिवसेना ओवळा माजिवडा विधानसभा क्षेत्र संपर्कप्रमुख नरेश मणेरा यांचे खास कौतुक यासाठी करावे की, नरेश मणेरा हे सतत १२ वर्ष शिवसेना महाराष्ट्र महोत्सव हा भव्यदिव्य कार्यक्रम येथे आयोजित करत आले आहेत. विशेषतः गेल्या दोन वर्षांत नरेश मणेरा यांनी जास्तच जोर मारलेला आहे. या शिवसेनेच्या महाराष्ट्र महोत्सवाचे आयोजक असलेल्या नरेश मणेरा यांना आपल्याला विधानसभेत पाठवायचा आहे. राजन विचारे ही आपली जबाबदारी आहे. येथे उपस्थित या सगळ्यांचीही ही जबाबदारी आहे. मघाशी छान गाणे झाले. पल पल दिलके पास, ही शिवसेना आहे. या गाण्याप्रमाणे शिवसेना आपल्या अगदी मनात आहे, ती कोणी काढू शकत नाही.

आपणच खरे बाजीगर आहोत. बाकी बाजीराव येतात आणि बाजीराव जातात. ठाण्याचे खरे बाजीगर इथे आहेत. शिवसेना ओवळा माजिवडा विधानसभा क्षेत्र संपर्कप्रमुख नरेश मणेरा आणि शिवसेना नेते, खासदार राजन विचारे यांनी ठाण्याचा गड उत्तमरितीने सांभाळला आहे. ज्या मोठ्यासंख्येने जनता येथे उपस्थित राहिली आहे. हे पाहून खात्री पटली की ठाणे हे शिवसेनेचे व शिवसेना ही ठाण्याचीच आहे, असे उद्गार शिवसेना नेते, खासदार संजय राऊत यांनी काढले.

# महाराष्ट्राची अधोगती थांबवायची असेल तर निष्ठावान नरेश मणेरा यांच्यामागे उभे रहा – डॉ जितेंद्र आव्हाड

**ठाणे :** महाराष्ट्र हे गुंडाराष्ट्र झाले आहे. महाराष्ट्राची ही अधोगती थांबवायची असेल तर आपल्यासमोर दोनच पर्याय आहे. एकतर निष्ठावान नरेश मणेरा यांच्यासारख्या माणसाच्या मागे उभे रहा किंवा गद्दारांना मतदान करा. यामुळे मतदान विचार करुन करा, महाराष्ट्र वाचवायचा असेल तर गद्दारांना गाडून टाका, असे मत राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय सरचिटणीस, आमदार डॉ. जितेंद्र आव्हाड यांनी व्यक्त केले.

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे शिवसेना ओवळा माजिवडा विधानसभा क्षेत्र संपर्कप्रमुख व वैष्णवी प्रतिष्ठानचे अध्यक्ष नरेश मणेरा यांनी आयोजित केलेल्या महाराष्ट्र महोत्सवात प्रमुख अतिथी म्हणून डॉ जितेंद्र आव्हाड बोलत होते. याप्रसंगी ठाणे राष्ट्रवादी काँग्रेस अध्यक्ष सुहास देसाई, युवक अध्यक्ष विक्रम खामकर, गजानन चौधरी, श्रीकांत भोईर आदी मान्यवर उपस्थित होते.

नरेश मणेरा हा माझा जुना मित्र आहे. पण मी उपस्थित जनतेसमोर सांगतो. मी आज त्यांच्याकडून पुष्पगुच्छ घेऊ शकत नाही. ज्येष्ठ पत्रकार निखिल वागळे यांच्यावर पुण्यामध्ये भयावह हल्ला झाला. पोलीस आजुबाजुला असताना निखिल वागळे यांना मारण्यात आले. त्यांची गाडी फोडण्यात आली. अभिषेक घोसाळकर यांना गोळ्या मारण्यात आल्या. महाराष्ट्र राज्य हे पुरोगामी राज्य म्हणून ओळखले जायचे आता महाराष्ट्र हे गुंडाराष्ट्र म्हणून ओळखले जावू लागले आहे. जनता जोपर्यंत उद्रेक करत नाही, तोपर्यंत हे घटनाबाह्य सरकार असेच चालू राहील. हे वर्ष निवडणुकांच वर्ष आहे. काम होतच राहतात, पाणी येतच राहील, लाईट लागतच राहील, राजकारणी राजकारण करतच राहतील पण जनतेने काय करायच आहे ? याचा विचार जनतेने करायला हवा. हा महाराष्ट्र यशवंतराव चव्हाणांच्या विचारांचा आहे, हा महाराष्ट्र एस.एम. जोशी यांच्या विचारांचा आहे. शिव, फुले, शाहू, आंबेडकर यांचे विचार सांगणारा आहे. या महाराष्ट्रात जर असे होत असेल तर ती तुम्हाला आणि आम्हाला दोघांनाही लाजिरवाणी अशी गोष्ट आहे. शेवटी मतदार निवडून देत असतात, त्या मतदारांना निर्णय घ्यावा लागेल, की महाराष्ट्र हातात राहू द्यायचा की, महाराष्ट्राची अशी अधोगती चालू ठेवायची. जर तुम्हाला ती थांबवायची असेल तर तुम्हाला दोनच पर्याय आहेत, एकतर निष्ठावान, नरेश मणेरा यांच्यासारख्या माणसाच्या मागे उभे रहा नाहीतर गद्दारांना मतदान करा तुम्हाला महाराष्ट्रात सूर्याची पिसाळांची अवलादी हव्या आहेत की या महाराष्ट्रात, शिवा काशीद हवेत. ज्यांनी छातीचा कोट करून महाराजांचा जीव वाचवला होता तसे शिवा काशीद हवेत, निर्णय तुमचा आहे. या महाराष्ट्राच्या मातीचा स्पर्श माझ्या कपाळाला झाला आहे, त्यामुळे तुम्हाला एवढीच विनंती करतो की मतदान विचार करुन करा, महाराष्ट्र वाचवायचा असेल तर गद्दारांना गाडून टाका, काल अभिषेक घोसाळकर होता, आज निखिल वागळे आहे, उद्या मी असेन, नरेश मणेरा असेन, राज्यातील पोलीस आता हतबल झालेत, पोलीसी कारभारात आता राजकीय हस्तक्षेप वाढला आहे. आणि ज्याला १९४५ साली पोलीसस्टेट म्हणायचे त्यासारखे हे महाराष्ट्र राज्य, गुंडांच्या हातात जात आहे आणि पोलीस निष्प्रभ ठरत आहेत. ज्यांच्या मागे राजाश्रय असतो तो जिवंत राहतो, बाकीचे सर्व मारले जातात त्याला पोलीसस्टेट म्हणतात. या पोलीसस्टेटची निर्मिती आता महाराष्ट्रात होऊ लागली आहे. याचा मी निषेध करतो, लोकशाही मारली जात असताना मी आनंदोत्सव साजरा करु शकत नाही, असे उद्गार डॉ जितेंद्र आव्हाड यांनी काढले.

**राज्यकारभार कोसळतो आणि राजाश्रय असणाऱ्या गुंडांना संरक्षण मिळते तेव्हा पोलीसस्टेट निर्माण होते. युरोपमध्ये १९४५ साली अनेक पोलीसस्टेट निर्माण झाली होती. यामुळे दुसरे महायुद्ध झाले. सध्या महाराष्ट्रात जे काही चालू आहे ते लज्जास्पद आहे. महाराष्ट्राचे वाटोळे करायला निघालेल्या या सरकारचा जेव्हढा निषेध करावा तेव्हढा थोडाच आहे. पोलिसांसमोरच, आम्ही सभा उधळू, अशी धमकी दिली जाते आणि पोलीस संरक्षणात ज्येष्ठ पत्रकार निखिल वागळे यांच्यावर हल्ला केला जातो. पण गुन्हेगारांना अटक केली जात नाही. हल्लेखोरांवर ३०७, १२० क अन्वये कलम लावून गुन्हे दाखल करावेत अशी जाहीर मागणी राष्ट्रवादी काँग्रेस व महाविकास आघाडीच्या वतीने करीत आहे, अशी मागणी, राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय सरचिटणीस, आमदार डॉ जितेंद्र आव्हाड यांनी पत्रकारांशी बोलताना केली.**

# ठाण्यात प्रथमच चरस (हॅश)ऑइल जप्त; इन्स्टाग्रामवर विक्रीचा बाजार मांडणाऱ्यास अटक

**ठाणे :** इन्स्टाग्रामवर मोठा फॉलोवर असल्याने त्याद्वारे अंमली पदार्थाच्या विक्री बाजार मांडत, ऑर्डर घेऊन त्याचे पॅकेट बनवून कुरिअरच्या माध्यमातून ग्राहकापर्यंत पोहचविणाऱ्या ऋषभ भालेराव (२८) याला ठाणे शहर पोलिसांच्या वागळे इस्टेट गुन्हे शाखेने अटक केली. त्याच्याकडून ६० किलो ५०० ग्रॅम वजनाचा ३१ लाख २ हजार २०० किमतीचा गांजा, २९० ग्रॅम चरस, १९ छोट्या चरस (हॅश)ऑइल असा मुद्देमाल हस्तगत केला असून ठाण्यात प्रथमच चरस (हॅश)ऑइल जप्त करण्यात आला आहे. तसेच त्याला येत्या १२ फेब्रुवारी रोजीपर्यंत पोलीस कोठडी मिळाली असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

ठाण्याच्या वागळे इस्टेट इंदिरानगर परिसरात गांजा विक्रीसाठी एक जण येणार असल्याची माहिती गुन्हे शाखा वागळे युनिट ५ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विकास घोडके यांना मिळाली होती. त्यानुसार सापळा रचून त्याला इंदिरानगर भाजी मार्केट येथून अटक करण्यात आली. त्यांच्याकडून विक्रीसाठी आणलेला ३ किलो २०० ग्रॅम गांजा, मोबाईल फोन, रोख रक्कम असा ४२ हजार ९०० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला. तसेच त्याच्या बदलापूर येथील राहत्या घरातून एकूण ६० किलो ५०० ग्रॅम वजनाचा ३१ लाख २ हजार २०० किमतीचा गांजा, २९० ग्रॅम चरस, १९ छोट्या चरस (हॅश) ऑइल असा मुद्देमाल पोलिसांनी हस्तगत केला.

शहापुर येथे राहणाऱ्या ऋषभ याने बदलापूर येथे अंमली पदार्थ ठेवण्यासाठी सदरची खोली वापरात आणीत होता. अमली पदार्थ विक्रीची कार्यपद्धती ही इंस्टाग्रामवर ऑर्डर घेऊन ग्राहकाने गुगल पे वर पैसे स्वीकारल्यानंतर मागणीनुसार ऋषभ हा कुरिअर द्वारे ग्राहांकापर्यंत पोहचवित होता. त्याचे इंस्टाग्रामवर ३ हजार ७५६ फॉलोवर आहेत. ज्या लोकांनी इंस्टाग्रामवर अमली पदार्थ खरेदीची ऑर्डर दिली. त्यांच्यावरही कारवाईची टांगती तलवार लटकत आहे. पुढील तपास वागळे इस्टेट गुन्हे शाखा युनिट-५ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विकास घोडके यांच्यामार्फत सुरू आहे.

**पोलिसांच्या हाताला प्रथमच चरस (हॅश)ऑइल**

प्रथमच चरस (हॅश)ऑइल हा अमली पदार्थ १२३ ग्रॅम हा पोलिसांच्या हाताला लागला आहे. याची आंतर राष्ट्रीय बाजारपेठेत १ किलोची किंमत १ कोटी रुपये असून पकडलेला गांजा हा मध्यप्रदेशातून आणल्याचा संशय पोलिसांकडून वर्तविण्यात आला.

दिशादर्शक, मार्गदर्शक!
# दिवा न्यूज
www.diwanews.com
सोमवार, दि. १२ फेब्रुवारी २०२४


# उद्योगांना चालना देण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करावेत – मुख्यमंत्री एकनाथ शिंदे





**ठाणे :–** राज्यातील उद्योगांना चालना देण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करावेत असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या वागळे औद्योगिक क्षेत्रातील भूखंड क्रमांक पी–४२ येथे बहुस्तरीय वाहनतळाच्या इमारतीचे भूमीपूजन व ''मुख्यमंत्री मऔविम कर्मचारी आरोग्य विमा योजनेचा'' (मेडिक्लेम पॉलिसी) शुभारंभ आज हॉटेल टिप–टॉप प्लाझा येथे झाला. त्यावेळी मुख्यमंत्री बोलत होते.

यावेळी उद्योग मंत्री उदय सामंत, माजी आमदार रविंद्र फाटक, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.बिपिन शर्मा, सहायक मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल भंडारी, विजय राठोड, एम आयटीएलचे एम.डी. श्री.मल्लिकनेर, स्थानिक पदाधिकारी आदि मान्यवर उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री.शिंदे म्हणाले, राज्यात उद्योगांना चालना मिळण्यासाठी सर्व सुविधा उपलब्ध पाहिजेत. राज्यात उद्योगांना गुंतवणूकीसाठी पोषक वातावरण आहे. आपल्या राज्यात जास्तीत जास्त उद्योग आले पाहिजेत, यासाठी आपण सर्वांनी प्रयत्न केले पाहिजेत. आपण सर्वांनी गतिमानतेने कामे केली पाहिजेत. आज महाराष्ट्र एफडीआय मध्ये क्रमांक १ चे राज्य आहे. उद्योगांसाठी असलेली ध्येय–धोरणे सुटसुटीत असली पाहिजेत.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या वागळे औद्योगिक क्षेत्रातील भूखंड क्रमांक पी–४२ येथे बहुस्तरीय वाहनतळ इमारतीमध्ये पार्किंग व्यवस्था वाढविली पाहिजे. एमआयडीसीतील अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या ८ वी ते १० वी च्या पाल्यांला दरवर्षी टॅबचे वाटप करण्यात येणार आहे. औद्योगिक विकास महामंडळातील ४५० अधिकारी, कर्मचाऱ्यांना पदोन्नती देण्यात आली. औद्योगिक विकास महामंडळातील अधिकारी, कर्मचारी व सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांसाठी मुख्यमंत्री मऔविम कर्मचारी आरोग्य विमा योजना (मेडिक्लेम पॉलिसी) सुरु करण्यात आली. हा एक चांगला उपक्रम एम आयडीसीने राबविला आहे.

राज्यात कॅशलेस आरोग्य सेवा संपूर्ण राज्यभर करण्यात येणार आहे. ''शासन आपल्या दारी'' या उपक्रमातून शासनाच्या योजना सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्यात आल्या आहेत. आतापर्यंत २ कोटी ८ लाख लाभार्थ्यांना याचा लाभ मिळाला आहे. प्रशासन त्यासाठी दिवसरात्र काम करीत आहे, एकही लाभार्थी योजनेपासून वंचित राहायला नको, यासाठी सर्वजण काम करीत आहेत. स्वच्छता मोहिमेमध्ये महाराष्ट्र प्रथम क्रमांकावर आहे. त्याचबरोबर मुख्यमंत्री सहायता निधी मधून गरजू रुग्णांना आतापर्यंत २.५ कोटी रुपयांचे वाटप करण्यात आले आहे.

यावेळी उद्योग मंत्री श्री.सामंत म्हणाले की, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळासाठी हा आजचा दिवस ऐतिहासिक दिवस आहे. गेले १६ महिने महाराष्ट्र परकीय गुंतवणूकीमध्ये पहिल्या क्रमांकावर आहे. हे सर्व महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी घेतलेल्या मेहनतीमुळे शक्य झाले आहे. अधिकारी, कर्मचाऱ्यांनी मागणी करण्याअगोदरच त्यांच्या मागण्या पूर्ण केल्या पाहिजेत. ठाण्यात पार्किंगची व्यवस्था व्हावी व ट्रॅफिक पासून मुक्ती मिळावी, यासाठी औद्योगिक क्षेत्रातील भूखंड क्रमांक पी–४२ येथे बहुस्तरीय वाहनतळ व्हावे, हा मुख्यमंत्री महोदयांचा ड्रीम प्रोजेक्ट होता. यासाठी ३४ कोटी रुपये खर्च करुन हे बहुस्तरीय वाहनतळ पूर्ण करण्यात आले आहे.

यावेळी मंत्री श्री.सामंत यांच्या हस्ते महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळातील कर्मचाऱ्यांच्या काही पाल्यांना प्रातिनिधीक स्वरुपात काही पाल्यांना टॅबचे वाटप करण्यात आले. यापुढे दरवर्षी ८ वी ते १० वी मधील अधिकारी–कर्मचाऱ्यांच्या पाल्यांना टॅब वाटपाचे धोरण जाहीर करण्यात आले. औद्योगिक विकास महामंडळातील ४५० अधिकारी, कर्मचाऱ्यांना पदोन्नती देण्यात आली. औद्योगिक विकास महामंडळातील अधिकारी, कर्मचारी व सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांसाठी मुख्यमंत्री मऔविम कर्मचारी आरोग्य विमा योजना'' (मेडीक्लेम पॉलिसी) सुरु करण्यात आली. या विम्याचे हप्ते महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ भरणार आहे.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.बिपिन शर्मा यांनी केले. यावेळी त्यांनी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या वागळे औद्योगिक क्षेत्रातील भूखंड क्रमांक पी–४२ येथे बहुस्तरीय वाहनतळा विषयी माहिती दिली. कार्यक्रमाची सुरुवात राज्यगीताने व दिपप्रज्वलनाने झाली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचलन मानसी सोनटक्के यांनी केले. यावेळी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे अधिकारी, कर्मचारी, त्यांचे कुटुंब मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# संविधान व कायद्याच्या आधारे मार्गक्रमण केल्यास यशप्राप्ती – सतीश वाघोले

**मुंबई :** विधी विधान शाखेतील राज्यातील दहा विद्यार्थ्यांसाठी इंटर्नशिप कार्यक्रम शासनाने राबविला होता. विधी विधान शाखेच्या विद्यार्थ्यांसाठी प्रथमच केलेला हा प्रयोग यशस्वी ठरला असून, संविधान व कायद्याच्या आधारे मार्गक्रमण केल्यास आयुष्यात यशप्राप्ती होणार असल्याचे सचिव सतीश वाघोले यांनी सांगितले.

मंत्रालयात विधी व न्याय विभागाच्या विधी विधान शाखेतील कामकाजाचा प्रत्यक्ष अनुभव घेता यावा, यासाठी विधी विधान शालखेतील १० मुलांची इंटर्नशीपसाठी निवड करण्यात आली होती. या सहा आठवड्याच्या इंटर्नशीप नंतर समारोप कार्यक्रमाचे आयोजन मंत्रालयात करण्यात आले होते. यावेळी सचिव वाघोले विद्यार्थ्यांशी संवाद साधताना बोलत होते.राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या ( २०२० ) अंमलबजावणीमध्ये शैक्षणिक अभ्यासक्रमामध्ये इंटर्नशिप हा महत्वाचा भाग असून विधी विषयक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना इंटर्नशिप लागू करण्यात आली आहे. विधी विधान विषयक कार्यपद्धतीची माहिती कोणत्याही विधी महाविद्यालयात शिकवली जात नाही किंवा अभ्यासक्रमाचाही भाग नाही. कायद्याच्या विद्यार्थ्यांसाठी असा उपक्रम सुरु करणारे महाराष्ट्र हे देशातील एकमेव राज्य आहे. विधी विधान शाखेत कायदे तयार करणे, कायद्यांमध्ये सुधारणा करणे, अध्यादेश प्रख्यापित करणे, विधानमंडळात विधेयके पारित करण्याची कार्यपद्धती अधिनियमांखालील नियम तयार करणे, अधिसूचना काढणे आदी कामकाज चालते. याची माहिती विद्यार्थ्यांना या कालावधीत देण्यात आली. मंत्रालय, विधानभवन, राजभवन तेथे चालणारे कामकाज याची माहिती दिली. सचिव वाघोले म्हणाले की, कायदा तयार करताना तो इतर कायद्याला अधिक्षेप करणार नाही, कोणतीही अस्पष्टता राहणार नाही, त्याचे नियम स्वयंस्पष्ट व्हावेत. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशाचे काटेकोर पालन नवीन कायदा तयार करताना करावे लागते. ही प्रक्रिया विद्यार्थ्यांना समजुन सांगण्याचे काम या कार्यकाळात करण्यात आले. राजभवन, विधानभवन आणि मंत्रालयातील विधी संदर्भातील कार्यपद्धती त्यांना शिकविण्याचा प्रयत्न केला असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

# शिक्षण विभागाने मागविला सर्व उपसंचालकांकडून तातडीचा अहवाल

## वाढत्या उष्णतेचा विचार करत शाळांचे वेळापत्रक बदलावे मनसेची मागणी

**ठाणे –** बदलत्या जीवनशैलीमुळे पहाटे शाळा असेल तर लहान मुलांची झोप होत नाही. त्यामुळे त्यांच्या शाळांच्या वेळा बदलण्याचा विचार करत येत्या शैक्षणिक वर्षापासून इयत्ता दुसरीपर्यंतच्या विद्यार्थ्यांची शाळा सकाळी ९ वाजल्यानंतर सुरू करण्यात येणार आहेत. त्याचप्रमाणे वाढत्या उष्णतेचा विचार करत सीबीएसई, आयसीएसई शाळाचे वेळापत्रक राज्य शासनाच्या शाळांच्या वेळापत्रकाप्रमाणे करण्याची मागणी मनविसे सरचिटणीस संदीप पाचंगे यांनी केली होती. यासंदर्भात शिक्षण संचालनालयाने शिक्षण उपसंचालकांना पत्राद्वारे अभिप्राय मागितला असून यावर लवकरच निर्णय होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

बदलत्या हवामानानुसार गेल्या काही वर्षात हवेतील उष्मा वाढत आहे. गेल्या दोन ते तीन वर्षांपासून एप्रिल महिन्यातील उच्चांकी तापमानाची नोंद झाली आहे. या पार्श्वभूमीवर राज्य सरकार सावधगिरीने पावले टाकत याचा विचार करणे आवश्यक आहे. राज्य शिक्षण मंडळाच्या सर्व शाळांना ही परिस्थिती लक्षात घेत सीबीएसई, आयसीएसई शाळाचे वेळापत्रक राज्य शासनाच्या शाळांच्या वेळापत्रकाप्रमाणे करणे आवश्यक आहे. पालकांना देखील उन्हात शाळा भरताना सुटताना उभे राहावे लागते. यासाठी उन्हाळी सुट्टीमध्ये बदल करायला हवा अशी मनविसेकडे समस्या मांडली होती त्यानंतर गतवर्षी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना मनविसे सरचिटणीस संदीप पाचंगे यांनी निवेदन दिले होते. याबाबत शिक्षण संचालनालय पुणे येथून सर्व विभागीय शिक्षण उपसंचालकांना त्वरित अभिप्राय सादर करण्याचे आदेश दिले आहेत.

> *महाराष्ट्र राज्य शासनाच्या प्राथमिक व माध्यमिक शाळा परीक्षा मार्च अखेर संपल्यानंतर एप्रिल, मे महिन्यात बंद असतात. गेल्या काही वर्षापासून मार्च, एप्रिल महिन्यात उष्णतेची तीव्रता वाढत आहे. बहुतांश शहरांमध्ये ४० अंशाच्या वर तापमान आहे. ठाण्यात एप्रिल महिन्यात ४३.३ अंश तापमानाची नोंद झाली आहे. सीबीएसई, आयसीएसई बोर्डाच्या शाळा एप्रिल महिना संपेपर्यंत चालू असतात. काही शाळांमध्ये पंखे देखील नादुरूस्त असतात. लहान मुले पाणी पिण्यास टाळाटाळ करतात त्यामुळे एखादया विद्यार्थ्याला उष्माघाताचा त्रास झाल्यास दुर्घटना घडू शकते.*
> **– संदीप पाचंगे, सरचिटणीस, मनविसे**

# नमो नमो करत ठाण्यात शिंदेगट भाजपच्या वाटेवर

## ग्रँड सेंट्रल पार्कला दिघेसाहेबांचे नाव का नाही?

### ठाकरेंच्या शिवसेनेचे जिल्हाप्रमुख केदार दिघे यांचा सवाल

**ठाणे:** एकीकडे माजी महापौर नरेश मस्के म्हणतात, की आम्ही आता नमो सैनिक, मुख्यमंत्र्यांनी ग्रँड सेंट्रल पार्कचे नाव नमो दी ग्रँड सेंट्रल पार्क असे नामकरण केले. असेच नमो नमो करत शिंदे गट आता भाजपच्या वाटेवर चालला आहे, असा हल्लाबोल शिवसेनेचे ठाणे जिल्हाप्रमुख केदार दिघे यांनी केला आहे. अशी

सोशल मीडियावर पोस्ट करत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे ठाणे जिल्हाप्रमुख केदार दिघे यांनी शिंदे गटाच्या भूमिकेचा जोरदार समाचार घेतला आहे.

अलीकडेच शिंदे गटाचे नेते नरेश म्हस्के यांनी आम्ही आता नमो सैनिक असल्याचे जाहीर केले होते. त्यानंतर ठाण्यातील ग्रँड सेंट्रल पार्कला मुख्यमंत्र्यांनी नमोग्रँड सेंट्रल पार्क असे नाव दिले. दिवंगत धर्मवीर आनंद दिघे यांचे ठाण्याच्या जडणघडणीत असणारे योगदान लक्षात घेऊन खरंतर तमाम ठाणेकरांची अपेक्षा होती की या सेंट्रल पार्कला दिघे साहेबांचे नाव दिले जाईल. पण नमो सैनिकांनी त्यांच्या नेत्यांचे नाव दिले. नमो नमो करत शिंदे गट भाजपच्या वाटेवर चालण्याचे हे जणू संकेत आहेत, असा हल्लाबोलच केदार दिघे यांनी सोशल मीडियाच्या पोस्टद्वारे केला आहे. बाळासाहेब ठाकरे आणि दिघे साहेबांचे विचार शिंदे गटाकडे पूर्वीपासूनच नव्हते. बाळासाहेब ठाकरे आणि दिघे शिंदे गटाला फक्त बॅनर वरील फोटोसाठी हवे असतात. बाळासाहेब आणि दिघे साहेबांचा विचार हा कधीच भाजप धाजिरणा नव्हता. केवळ सत्ता आणि स्वतः केलेले गैरव्यवहार दडपण्यासाठीच शिंदे गटाने शिवसेनेशी गद्दारी केली. आता त्यांच्या कृतीतून शिवसेना विरोधी भूमिका वारंवार स्पष्ट होत असून गुरुवर्य आनंद दिघे यांचा विसर शिंदे गटाला पडत चालल्याचे दिसत असल्याचा हल्लाबोल केदार दिघे यांनी केला आहे.

# पालिका क्षेत्रातील पाणीपुरवठ्याचे लेखा परिक्षण १६ वर्षे रखडले

## संबंधित अधिकाऱ्यांवर कठोर कायदेशीर कारवाईची मनसेची मागणी

**ठाणे–** ठाणे शहरात अनेक ठिकाणी पाण्याची गळती असो किंवा पाणी टंचाईची भीषण परिस्थिती याचा नाहक त्रास ठाणेकरांना सहन करावा लागत असतानाच महापालिका क्षेत्रातील पाणी पुरवठ्याचे लेखापरीक्षण गेली १६ वर्षे होत नसल्याची धक्कादायक बाबत उघडकीस आली आहे. कोट्यवधी रूपये खर्च करूनही ठाणेकरांना म ुबलक पाणी मिळत नाही हीच मोठी शोकांतिका असून याप्रकरणी जबाबदार अधिकाऱ्यांवर कठोर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी मनविसे सरचिटणीस संदीप पाचंगे यांनी केली आहे.

ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील पाणीपुरवठ्याचे लेखा परिक्षण गेली १६ वर्षे होत नसल्याची बाब पाणी पुरवठा तक्रार समितीच्या बैठकीत समोर आली आहे. ठाणे महापालिका क्षेत्रातील पाणी टंचाईच्या समस्येबाबत उच्च न्यायालयात एक जनहित याचिका २०१६ मध्ये दाखल झाली होती. घोडबंदर भागातील गृहसंकुलांना अधिक टंचाईच्या झळा बसत असल्याच्या तक्रारी नागरिकांनी समितीपुढे केल्या. पालिकेची पाणी देयके भरूनही तसेच महापालिकेला माजिवडा-मानपाडा प्रभाग समिती क्षेत्रातील घोडबंदर परिसरातून दरवर्षी २०० कोटींपेक्षा अधिक मालमत्ता कर गोळा होत असतानाही या परिसरात पुरेसे पाणी मिळत नसल्याने टँकरद्वारे पाणी विकत घ्यावे लागत आहे. यामुळे टँकर खर्चाचा अतिरिक्त भार नागरिकांवर पडत असल्याच्या तक्रारी नागरिकांनी केल्या. टँकर मार्फत गृहसंकुलांना पाणी पुरवठा करणारे ठेकेदार व पाणी पुरवठा विभागातील अधिकारी संगनमताने ठाणेकरांना जाणीवपूर्वक वेठीस धरत आहेत असा आरोप संदीप पाचंगे यांनी केला आहे.

पालिका हद्दीत पाणी पुरवठा करणाऱ्या स्रोतांकडून किती पाणी घेतले जाते, प्रत्यक्षात पाण्याचा किती पुरवठा होतो आणि पाण्याची गळतीचे प्रमाण किती, याची माहिती पालिकेकडे उपलब्ध असेल तर शहरातील पाणी पुरवठा नियोजन करणे सोपे जाईल आणि पाणी टंचाई कमी होण्यास हातभार लागेल, त्यामुळे लेखापरीक्षण करणे गरजेचे आहे.

दिवा न्यूज
वाचा दर सोमवारी

आता डिजिटल स्वरूपात...
दिवा न्यूजची वेबसाईट सुरु..!
ताज्या घडामोडी आणि बातम्यांसाठी लॉग इन करा
www.diwanews.com
आता कुठेही असा...दिवा न्यूज वाचा एका क्लिक वर..
epaper.diwanews.com